# मिरा भाईंदर महानगरपालिका

उपायुक्त (मु.) यांचे कार्यालय,
ई-मेल : dmchq@mbmc.gov.in
जा.क्र.मनपा/उपायुक्त(मु.)/ ७५३ /२०२५-२६
दि. १३ / ०१ /२०२६

**निवडणूक तात्काळ :-**

**आदेश**

**विषय : निवडणूक कामी कार्यालयात उपस्थित राहणेबाबत.**

**संदर्भ : मा. आयुक्त तथा प्रशासक यांचेकडील दि. १३/०१/२०२६ रोजीच्या बैठकीतील निर्देश.**

मा. राज्य निवडणूक आयोगाने जाहिर केलेल्या कार्यक्रमानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करिता दि. १५/०१/२०२६ रोजी मतदान व दि. १६/०१/२०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. मा. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार निवडणुकीचे कामकाज करणेकरिता निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातील तसेच विविध पथकात कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने सर्व अधिकारी / कर्मचारी यांना या आदेशाद्वारे सूचित करणेत येते की, दि. १४/०१/२०२६ ते दि. १६/०१/२०२६ (मतदान ते मतमोजणी) या कालावधीत निवडणुकीचे कामकाज करणेकरिता कार्यालयात उपस्थित राहावे. तसेच सदर कालावधीत कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांची रजा मंजूर करु नये व कोणीही रजेवर जाऊ नये . जे अधिकारी / कर्मचारी उपस्थित राहणार नाहीत त्यांचेवर निवडणूक कामकाजात अडथळा निर्माण केल्यामुळे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

13/01/26

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (मु.) तथा
उप-निवडणूक अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.)

प्रति,
सर्व अधिकारी / कर्मचारी, मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :
निवडणूक निर्णय अधिकारी क्र. १ ते ७, मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :
मा. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\\ निवडणूक 2025\\13.01 आदेश.docx



Scanned with OKEN Scanner